सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७० | शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com






**श्री. वसंतबापू पाटील**
उद्योगपती



**श्री. नरेंद्र पाटील**
सरपंच गांधली



**श्री. राजेंद्र महाजन**
अमळनेर



**श्री. प्रशांत जोशी**
अमळनेर



**श्री. राज जैन**
महावीर ग्रुप, अमळनेर



**श्री. यश जैन**
महावीर ग्रुप, अमळनेर

# अमळनेरच्या भूषण चौधरींची सामाजिक बांधिलकी

## दुबईत अडकलेल्या पर्यटकांना मदतीचा हात!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबईमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना मदत करण्यासाठी सुरू करण्यात आलेली 'आयपीएफ' महाहेल्पलाइन सेवा सध्या मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. या उपक्रमात अमळनेरचे सुपुत्र भूषण चौधरी यांनीही मोलाची कामगिरी बजावली आहे.

दुबईमध्ये वास्तव्यास असलेल्या मराठी प्रवासी व समुदायाला मदत करण्यासाठी ही हेल्पलाइन सुरू करण्यात आली असून, ती सध्या महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांसाठी विशेष मदत केंद्र म्हणून कार्य करत आहे. हेल्पलाइन सुरू झाल्यानंतर अवघ्या एका दिवसात १ हजार २०० हून अधिक प्रवाशांकडून मदतीच्या विनंत्या प्राप्त झाल्याची माहिती या उपक्रमाचे नेतृत्व करणारे राहुल तुळपुळे यांनी दिली. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे दुबई येथील भारतीय कॉन्सुल जनरल आणि आयपीएफ महाहेल्पलाइनच्या व्यवस्थापन पथकाशी सातत्याने संपर्कात आहेत. राज्य सरकारच्या मान्यतेने सुरू असलेली ही हेल्पलाइन (९७१ ५० ३६५ ४३५७) दुबईमधील पाच शहरांमध्ये २० हून अधिक स्वयंसेवकांच्या माध्यमातून २४ तास कार्यरत आहे.

या हेल्पलाइनद्वारे अडकलेल्या प्रवाशांना मुक्काम वाढविणे, अन्न व औषधांची उपलब्धता, तात्पुरती निवास व्यवस्था, वाहतूक सुविधा तसेच दूतावासाशी समन्वय अशा विविध प्रकारची मदत पुरवली जात आहे. याशिवाय स्थानिक डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र वैद्यकीय सहाय्य पथकही कार्यरत आहे. या कार्यात अमळनेर येथील निवृत्त प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी यांचे ज्येष्ठ चिरंजीव व दुबईमध्ये कार्यरत असलेले भूषण चौधरी यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ते हेल्पलाइनचे डेटा व्यवस्थापन, व्हॉट्सअॅप गटांचे नियोजन तसेच अडकलेल्या प्रवाशांमध्ये व स्वयंसेवकांमध्ये समन्वय साधण्याचे काम पाहत आहेत. भूषण चौधरी हे पर्यावरण प्रेमी आशिष चौधरी यांचे मोठे बंधू असून त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे अमळनेर तालुक्याच्या नावाला दुबईमध्येही मान मिळत आहे.

# पत्नीस जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न

## आरोपी पतीस सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पत्नीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी असलेला पती भगवान रामदास शिंपी (वय ६०, रा. ताडेपुरा, अमळनेर) यास सात वर्षे सश्रम कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. अमळनेर न्यायालयाने बुधवार, दि. ११ मार्च रोजी हा निकाल दिला.

खटल्याची पार्श्वभूमी अशी : येथील पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३०७, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदरचा अपराध दि. १ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी घडला होता. फिर्यादी ही अमळनेर शहरातील मजुरीची कामे आटोपून घरी गेली होती. ती घरात हजर असताना पती भगवान शिंपी हे घरी आले. तेव्हा ती फोनवरुन तिची मुलगी रोशनी हिच्याशी बोलत होती. तेव्हा तिचा पती भगवान शिंपी याने शिवीगाळ करुन चारित्र्यावर संशय घेतला. आता मारुनच टाकतो, असे म्हणून घराबाहेर निघून गेला. त्यानंतर रात्री ८ वाजता घरासमोर ओट्यावर बसलेली असताना पती भगवान शिंपी हा घरी आला. तिला पाहून पुन्हा शिविगाळ करत तिला चापटाबुक्यांनी मारहाण करुन तिला खाली जमिनीवर आडवे पाडले. पॅन्टच्या खिशातून चाकूसारखे धारदार हत्यार काढून तिच्या गळ्यावर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार करुन दुखापती केल्या. त्यानंतर तो पळून गेला. या घटनेत तिच्या गळ्यावर मानेवर, हनवटीवर व दोन्ही हातावर गंभीर दुखापती झाल्या. या प्रकरणी अमळनेर येथील जिल्हा न्यायाधीश १ व अति. सत्र न्यायाधीश श्रीमती सी. व्ही. पाटील यांच्या न्यायालयासमोर खटला सुरू होता. सरकारी वकील अॅड. किशोर बागुल (मंगरुळकर) यांनी एकूण ६ साक्षीदार तपासले. त्यातील फिर्यादी ही आरोपीची पत्नी होती. तिच्यावरच हमला झाल्याने स्वत: उपचार घेत असताना तिने दिलेला जबाब न्यायालयात सादर करण्यात आला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार रवी टेलर, पंच व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश ताडे यांची साक्ष ग्राह्य धरण्यात आली. सर्व साक्षी तपासून आरोपी भगवान शिंपी यास न्यायालयाने सात वर्ष सश्रम कारावास व २ हजार रुपये दंड अशी शिक्षा न्यायालयाने सुनावली. जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याबद्दल दोन वर्षे व दंड रक्कम १ हजार रुपये अशी शिक्षा सुनावली. या कामकाजात हवालदार पुरुषोत्तम वाल्डे, केस वॉच व पैरवी अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक उदेसिंग साळुंके, पारोळा पोलीस ठाण्याचे पैरवी अधिकारी हवालदार राहुल रणधीर, चोपडा ग्रामीणचे हवालदार प्रमोद पाटील, चोपडा शहर पोलीस ठाण्याचे हवालदार सतीश भोई, अडावद पोलीस ठाण्याचे हवालदार भरत इशी आदींचा समावेश आहे.

कंत्राटी कामगार 'पीएफ' प्रकरण

# पुरावे सादर होत नाही तोवर बिले अदा करू नयेत

## नगरसेवक नाविद शेख यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील पालिकेतील कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या (पीएफ) रकमेबाबत कंत्राटदाराकडून अनियमितता होत असल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर जोपर्यंत कंत्राटदार पीएफ भरल्याचा अधिकृत पुरावा सादर करत नाही, तोपर्यंत त्यांची थकीत बिले अदा करू नयेत, अशी मागणी नगरसेवक नाविद शेख यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मंगळवार, दि. १० मार्च रोजी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

येथील पालिकेच्या घंटागाडी विभागात मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार काम करतात. कंत्राटी कामगार कायद्यानुसार, कंत्राटदाराने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कापलेली पीएफची रक्कम आणि स्वत:चा हिस्सा सरकारी तिजोरीत वेळेवर जमा करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेकदा कंत्राटदार कामगारांच्या हक्काचे पैसे न भरताच आपली देयके मंजूर करून घेतात, असा संशय व्यक्त केला जात आहे.

**नगरसेवक शेख यांच्या मागण्या**

कंत्राटदाराने मागील महिन्यांचा पीएफ भरल्याची अधिकृत पावती (चलन) आणि कोणत्या कर्मचाऱ्याचा किती पीएफ भरला याची सविस्तर यादी सादर करावी. त्याशिवाय त्यांचे चालू किंवा थकीत देयक अदा करू नये. कंत्राटदाराने कामगार कायद्याचे उल्लंघन केले असल्याचे आढळल्यास, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. कामगारांच्या घामाचा पैसा त्यांच्या हक्काच्या पीएफ खात्यात जमा झालाच पाहिजे. कंत्राटदारांच्या मनमानीमुळे गरीब कामगातेरांचे आर्थिक नुकसान होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही. प्रशासनाने पारदर्शकता जपण्यासाठी पीएफच्या पावत्या तपसल्याशिवाय देयके काढू नयेत.

# प्रताप महाविद्यालयाच्या लेडीज होस्टेलला लीनेसे क्लबतर्फे प्रिंटर भेट, सॅनिटरी पॅडचे वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयाच्या लेडीज होस्टेलमध्ये सामाजिक उपक्रमांतर्गत लीनेसे क्लबतर्फे प्रिंटर भेट देण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात समाजसेविका जस्मीन भरुचा यांनी सुमारे १९ हजार ५०० रुपये किमतीचा प्रिंटर होस्टेलला भेट दिला आहे. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक कामांसाठी या प्रिंटरचा चांगला उपयोग होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यासोबतच विद्यार्थिनींच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन स्टेशनरीही देण्यात आली. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.



*अमळनेर : लीनेसे क्लबतर्फे प्रताप महाविद्यालयाच्या लेडीज होस्टेलला नुकतेच प्रिंटर भेट देण्यासह सॅनिटरी पॅडचे विद्यार्थिनींना वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित अध्यक्षा कविता पारख, जस्मीन भरुचा, परमिंदर कालरा यांच्यासह विद्यार्थिनी.*

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे असल्याचे लीनेसे क्लबच्या अध्यक्षा कविता पारख यांनी सांगितले. याप्रसंगी होस्टेलच्या कर्मचाऱ्यांसह कविता पारख, जस्मीन भरुचा व परमिंदर कालरा उपस्थित होते. कार्यक्रमाला सुमारे ५० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. होस्टेल प्रशासनासह प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य व खा. शि. मंडळाच्या संचालकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले असून, संबंधितांचे आभार मानण्यात आले आहेत.

# घरगुती गॅस सिलिंडरबाबत भरारी पथकाची नियुक्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर, साठेबाजी किंवा काळाबाजार होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. यात तहसीलदार, पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, बीपीसीएल, एचपीसीएल आयओसीएलचे सेल्स अधिकारी तसेच निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांचा समावेश आहे. नागरिकांना घरगुती गॅस पुरवठ्याबाबत काही तक्रारी असल्यास (०२५) २२२३१८० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा किंवा dso-jalgaon1@gmail.com या ई-मेलवर तक्रार नोंदवावी.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# युद्ध पेटले पण सोन्याचे दरही आपटले!

## गुंतवणूकदारांची धाकधूक वाढली, तज्ज्ञांनी सांगितले धक्कादायक कारण...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याच्या किमतीत गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सलग दुसऱ्या दिवशी मोठी घसरण पाहायला मिळाली. आखाती देशांमध्ये युद्धाची परिस्थिती असतानाही सोन्याचे दर घसरल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतीत गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी मोठी घसरण पाहायला मिळाली. आखाती देशांमध्ये युद्धाची परिस्थिती असतानाही सोन्याचे दर घसरल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भू-राजकीय तणावाच्या स्थितीत गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळतात. त्यामुळे दरात वाढ होते. साधारणपणे सोन्याचे दर वाढतात. मात्र, सध्या उलट चित्र दिसत आहे. आशियाई बाजारात सोन्याचे दर सुमारे ०.३९ टक्क्यांनी घसरून ५,१५९ डॉलर प्रतिऔंसवर आले आहेत.

आज देशात १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर एक लाख ६२ हजार १६० रुपये, तर २२ कॅरेटसाठी १० ग्रॅम सोन्याचा



दर एक लाख ४८ हजार, ६४७ रुपये होता. तर १ किलो चांदीचा दर दोन लाख ६७ हजार ५६० रुपये होता. याशिवाय १० ग्रॅम चांदीचा दर २,६७६ रुपये होता.

**नेमके कारण काय?**

युद्ध सुरू असूनही सोन्याचे भाव का घसरत आहेत, यामागे काही तांत्रिक आणि आर्थिक कारणे असल्याचे तज्ज्ञ असतात. युद्धामुळे जागतिक अनिश्चितता वाढली असली, तरी अमेरिकन डॉलर अधिक मजबूत झाला आहे. डॉलर इंडेक्समध्ये ०.२ टक्क्यांची वाढ झाल्यामुळे परदेशी गुंतवणूकदारांसाठी सोने खरेदी महाग झाली आहे. परिणामी मागणी घटली आहे. अमेरिकेतील महागाईचे आकडे पाहता फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात करण्याची शक्यता कमी झाली आहे. जोपर्यंत व्याजदर चढे राहतील तोपर्यंत सोन्यासारख्या 'बिगर-उत्पन्न' देणाऱ्या मालमत्तेवरील गुंतवणूकदारांचा कल कमी असतो. आखातामधील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत. ज्यामुळे महागाई वाढण्याची भीती आहे. अशा स्थितीत गुंतवणूकदार सोन्यापेक्षा इतर पर्यायांकडे वळत आहेत.

**तज्ज्ञांचा अंदाज काय?**

बाजार तज्ज्ञांच्या मते सध्या सोने ५,००० ते ५,३०० डॉलर प्रतिऔंसच्या दरम्यान स्थिरावले आहे. जर सोन्याने ५,००० ते ५,१०० डॉलरचा महत्त्वाचा 'सपोर्ट' तोडला, तर दरात अजून मोठी घसरण होऊ शकते. मात्र, जर ५,४०० डॉलरच्या वर ब्रेकआऊट मिळाला, तर सोने नवी ऐतिहासिक उंची गाठू शकते. दुसरीकडे चांदीच्या दरात गुरुवारी किंचित सुधारणा पाहायला मिळाली. स्पॉट सिल्व्हर ०.१२ टक्क्यांनी वधारून ८५.६५ डॉलर प्रतिऔंसवर व्यवहार करत आहे. मात्र, सोन्याच्या तुलनेत चांदीची कामगिरी सध्या कमकुवत दिसत आहे.

## संपादकीय

# हुंडा घेणाऱ्यांची नाकेबंदी हवी

प्रगतीशील महाराष्ट्र किंबहुना महिला शिक्षणासंदर्भात देशातील पहिले महिला धोरण, सती प्रथा, पुनर्विवाह अशा अनेकानेक महिलाविषयक सुधारणांसाठी महाराष्ट्राचे नाव घेतले जाते. ज्या काळामध्ये महिलांना शिक्षणही नाकारले जात होते. निरक्षरता होती. अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा आणि परंपरांचा पगडा होता. अशा काळात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण मोठे असायचे. नुकताच आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा झाला. त्यात महाराष्ट्रातील महिलांचा सन्मान आणि त्यांच्या सक्षमीकरणाविषयी शासकीय स्तरावरून ग्वाही दिली गेली. वेगवेगळ्या योजनांचाही पाढा वाचला गेला. म्हणजेच महिलांविषयक अधिकाधिक सकारात्मक दृष्टिकोन आणि सक्षमीकरणाच्या योजना राबविल्या जात असतानादेखील हुंडाबळीसारखा अत्यंत कृतघ्न प्रकार महाराष्ट्राच्या मानगुटीवर अजूनही कायम आहे. विधानसभेतच विचारण्यात आलेल्या लक्ष्यवेधीच्या माध्यमातून शासनातर्फे जी अधिकृत आकडेवारी दिली गेली ती धक्कादायकच म्हणावी लागेल. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात हुंडाबळीचे ७९९ म्हणजे जवळपास ८०० गुन्हे नोंदविले गेले. याशिवाय असे अनेक हुंडाबळीचे प्रकार असतील की त्यांची पोलीस दप्तरी नोंद नसेल. अशा अदृश्य हुंडाबळीच्या प्रकारांचा विचार केला तर गेल्या पाच वर्षांत हजारापेक्षा जास्त हुंडाबळी झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कायद्याने हुंडा द्यायला घ्यायला बंदी असताना जर हे प्रकार घडत असतील तर कायदा कुचकामी ठरला हे वेगळे सांगायची गरज नाही. परंतु असे प्रकार रोखण्याकरिता अधिक कठोर कायदा करण्याची आवश्यकतादेखील सरकारला वाटलेली नाही, हीदेखील वस्तुस्थिती आहे. प्रत्यक्ष लग्न ठरवले जात असताना किंवा लग्नसोहळ्यांमध्ये अधिकृतपणे किंवा सगळ्यांसमोर हुंड्याची देवाणघेवाण होत नसेल. मात्र, छुप्या पद्धतीने वरपक्षाची मर्जी राखण्याकरिता हुंड्याच्या स्वरूपात वेगवेगळ्या किमती वस्तू देण्याचा प्रकार सुरू राहतो.

खरेतर कोणत्याही माध्यमातून किंवा प्रकारातून वधूपक्षाकडून घेतला जाणारा हुंडा म्हणजे नाते टिकविण्यासाठी मागितलेली खंडणीच ठरते. म्हणजेच खंडणी वसूल करणाऱ्या गन्हेगारांना जसा कडक कायदा लावला जातो तसा या हुंडा नावाच्या खंडणीखोरांना कडक कायदे लावले गेले पाहिजेत. साधारणपणे २०२०-२१ पासून महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी सव्वा ते दीडशे हुंडाबळीत गेल्याचे स्पष्ट होते. २०२१ ला हे प्रमाण १७२ होते. २०२५ ला ते १२८ पर्यंत खाली आले. २०२२ ला तर हे प्रमाण १८० पर्यंत पोहोचले होते. पाच वर्षांत हुंडाबळीचे प्रमाण कमी-कमी होत गेल्याचे दिसून येते. परंतु ते कमी होण्याची गती अतिशय संथ किंवा मंद आहे. आजही हुंडाबळीचे शंभराहून गुन्हे घडत असतील तर महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत आणि वैचारिकदृष्ट्यादेखील परिपक्व असलेल्या राज्यासाठी तो कलंक ठरतो. अर्थातच केवळ कायद्याने ही प्रथा पूर्णपणे बंद होणार नाही. यासाठी तितक्याच मोठ्या सामाजिक जागृतीची आवश्यकता आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात हीच जागृती आलेली पाहायला मिळते. हुंड्याच्या स्वरूपात रोख रक्कम तर दिली जात नाहीच. उलट लग्नाचा खर्च वधू आणि वर पक्ष निम्म्याने वाटून घेतो. मात्र, ग्रामीण किंवा आदिवासी भागात वेगवेगळ्या जाती संप्रदायांमध्ये पूर्वापार चालत आलेल्या या परंपरांचा पगडा पाहायला मिळतो. मुलगा जास्त शिकलेला असेल तितक्या अधिकाधिक प्रमाणात त्याला वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू देऊन खूश करण्याचा प्रयत्न केला जातो. अनेकवेळेला खेड्यापाड्यांमधील प्रतिष्ठित कुटुंबे किंवा त्यांचा मानमरातब पाहून लग्न ठरवले जाते आणि त्या प्रतिष्ठेला शोभेल अशा प्रकारचा घसघशीत खर्चही केला जातो. हुंड्याऐवजी आहेराच्या स्वरूपात अगदी मध्यमवर्गीय कुटुंबसुद्धा पाच-पाच, दहा-दहा लाख रुपये खर्च करत असतो. दुर्दैवाचा भाग असा आहे, की लग्नानंतर पैसा किंवा वस्तूंसाठी हपापलेली वराकडील मंडळी अस्वस्थ राहतात. लग्नानंतर मुलीकडे अधिकाधिक वस्तू मिळविण्याचा तगादा लावतात.

आपल्या वडिलांची आर्थिक परिस्थिती आणि एकूण परिस्थिती लक्षात घेऊन मुलीकडून जेव्हा सासरच्या मंडळींना नकार दिला जातो तेव्हा तिचा छळ सुरू करून सासरी आल्यानंतर माहेरी कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये या एकाच भावनेपोटी ती विवाहित मुलगी सर्व प्रकारचा जाच किंवा अत्याचारही सहन करीत राहते. जेव्हा या सगळ्या अत्याचाराचा कडेलोट होतो त्यावेळेला तिचा बळी जातो. सरकारने विधानसभेत विचारलेल्या लक्ष्यवेधीवर उत्तर देताना दिलेली आकडेवारी हा केवळ सरकारी उपचार ठरू नये. राज्यातील कोणत्याही विवाहित महिलेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी अधिक नवनवीन उपक्रम किंवा संकल्पना राबविण्याची आवश्यकता आहे. छळ होत असलेल्या महिला तक्रार करण्यासाठी पुढे येतीलच असे नाही. परंतु आजच्या तंत्रज्ञानयुगाचा ती काही क्षणात माहिती मिळू शकते. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीतून हे प्रकार रोखण्यासाठी जनजागृतीची मोहीमही राबविता येऊ शकते. दरवर्षी शंभरावर महिलांना सासरच्या या जाचाला कंटाळून जीव संपवावा लागतो, ही महाराष्ट्रासाठी खूप मोठी शोकांतिका ठरते. हुंडा नावाच्या या खंडणीचा अजूनही सुरू असलेला हा हैदोस संपुष्टात आणण्याकरिता कडक कायद्यांबरोबरच कौटुंबिक स्तरावरच्या जनजागृतीची आणि सहाय्यता केंद्रांचीही आवश्यकता आहे. आज महिलांच्या साक्षरतेत मोठी वाढ झालेली आहे. परंतु अगदी उच्चशिक्षित महिलाबाबतही हे प्रकार घडून येतात. नुकतीच नाशिकला एका डॉक्टर महिलेने केलेली आत्महत्या हे त्याचे ताजे उदाहरण ठरते. तो प्रकार हुंडाबळी किंवा अत्याचाराचा भाग नसेलही. परंतु उच्चशिक्षितांमध्ये असलेले कौटुंबिक स्तरावरचे नैराश्य तितकेच चिंताजनक ठरते. लाडक्या बहिणींचा उल्लेख वारंवार होतो, पण त्यातील काही बहिणींवर अशी वेळ येत असेल तर ते आणखीनच दुर्दैवी आहे.

# पासपोर्टसाठी महिन्याची वेटिंग, रोज होतेय ९० अर्जांची छाननी

## वीस दिवसांमध्ये १ हजार ८०० नागरिकांचे अर्ज, विद्यार्थ्यांच्या अर्जात घट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यात पासपोर्ट काढणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. सद्यःस्थितीत नवीन पासपोर्ट मिळवण्यासाठी किमान एक ते दीड महिने लागत आहे. जळगाव डाक विभागाच्या पासपोर्ट सेवा केंद्रात रोज सरासरी ९० अर्जांची छाननी केली जात आहे. यानुसार सुटीचे दिवस वगळून उर्वरित २० दिवसांत तब्बल १ हजार ८०० अर्ज पासपोर्टसाठी दाखल होत आहे.

टपाल विभागाच्या केंद्रात नवीन पासपोर्ट आणि पोलिस पडताळणी प्रमाणपत्र मिळून दररोज ९० अपॉइंटमेंट्सचे स्ट्रक्चर निश्चित केले आहे. अर्जांची पडताळणी करून ते पुढील प्रक्रियेसाठी मुंबईत मुख्य कार्यालयाकडे पाठवले जातात. अर्जात त्रुटी आढळल्यास त्यावर मुंबई कार्यालयामार्फतच पुढील निर्णय घेतला जातो.

### आठ ते ३० दिवसांत मिळतो पासपोर्ट

पासपोर्ट हातात पडण्यासाठी एक महिना लागतो. काहीवेळा ८ ते १० दिवसात तर कधी तांत्रिक कारणांमुळे १५ ते २० दिवसांचा उशीरही होऊ शकतो. सद्यःस्थितीत पासपोर्टचे वेटिंग लिस्ट एक ते दीड महिन्यापर्यंत पोहोचली आहे. कागदपत्रे पूर्ण असलेल्यांना सर्व व्हेरिफिकेशननंतर ८ ते १० दिवसात ते मिळते. ▲




### विदेशात फिरणाऱ्यांची संख्या अधिक

अर्जांमध्ये प्रामुख्याने पर्यटन किंवा फिरण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या अर्जांचे प्रमाण काहीसे कमी असल्याचे दिसून आले.

# शुभ संकेत देणारा भारद्वाज !

**पक्ष्यांची ओळख**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**नाव :** भारद्वाज
**रंग :** डोके व शेपूट काळी, पाठीवरचे पंख विटकरी रंगाचे, डोळ्याचा रंग लाल
**आकार :** कावळ्या एवढा
**खाद्य :** मांसाहरी असल्यामुळे भारद्वाज साप,किडे,सरडे खातो.
**घरटे :** बंगल्यांच्या झुडपात, बागेमध्ये, शेतातील कुंपणात झाडांवर घरटे बांधतो.
**अंडी :** मे महिन्यात मादी २३ अंडी घालते. अंड्यांचा रंग पांढरा.
**आवाज :** कूप कूप कूप घुमणारा स्वर भारद्वाज भारतभर आढळतो,पहाटे भारद्वाजाचे दर्शन शुभ मानले जाते. भारद्वाज कमी उडतो, जास्त चालतो. श्री मंगळग्रह मंदिराच्या झाडीत, अंबर्षि टेकडीवरील झाडीत भारद्वाजाची वस्ती आहे.

**संग्राहक : प्रा प्रकाश धर्माधिकारी निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर**



*अमळनेर : कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विद्यार्थिनींना पारितोषिक वितरण करताना खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन सीए नीरज अग्रवाल. शेजारी उपस्थित मान्यवर.*

# प्रताप महाविद्यालयात 'स्किलफेस्ट २०२६'ची सांगता

## सुमारे दीडशे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ अंतर्गत कार्यरत असलेल्या व्यवस्थापन व तंत्रज्ञान संस्थेच्या पुढाकाराने प्रताप महाविद्यालयात नुकताच 'स्किलफेस्ट २०२६' हा आंतरविभागीय शैक्षणिक महोत्सव उत्साहात पार पडला. पुज्य साने गुरुजी सभागृहात पारितोषिक वितरणही करण्यात आले.

'स्किलफेस्ट २०२६'चा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा व्यावहारिक वापर शिकवणे, आर्थिक साक्षरता वाढविणे आणि व्यवस्थापन व तांत्रिक शाखांमधील समन्वय दृढ करणे हा होता. बीबीए, बीसीए, एमसीए, बीकॉम, एमकॉम तसेच इयत्ता ११ वी व १२वीतील मिळून दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सक्रिय सहभाग घेतला. महोत्सवाअंतर्गत 'शार्क टँक स्टार्टअप' स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'एआय' साधनांचा वापर करून अभिनव व्यावसायिक संकल्पना मांडल्या. 'ॲड-मॅड डिजिटल शो'मध्ये दिलेल्या उत्पादनासाठी ६० सेकंदांची आकर्षक डिजिटल जाहिरात सादर करण्यात आली. 'बुल ऑफ वॉल स्ट्रीट' या शेअर बाजार सिम्युलेशन खेळातून विद्यार्थ्यांना बाजारातील चढ- उतारांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. 'क्यूआर कोड ट्रेझर हंट' स्पर्धेमुळे संघभावना, वेगवान निर्णयक्षमता आणि तांत्रिक कौशल्यांचा विकास झाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून सादरीकरण कौशल्य, आर्थिक विश्लेषण, डिजिटल मार्केटिंग आणि तांत्रिक साक्षरता या बाबींमध्ये उल्लेखनीय प्रगती दिसून आली. पारितोषिक वितरण समारंभात विजेत्यांना प्रमाणपत्रे व आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष सीए नीरज अग्रवाल यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, आयएमटीच्या संचालिका प्रा. वर्षा पाठक, उपप्राचार्य डॉ. योगेश तोरवणे, बीबीए विभाग प्रमुख डॉ. किरण सूर्यवंशी उपस्थित होते. ▲

### बीबीए, बीसीए प्रवेश प्रक्रिया सुरू

बीबीए व बीसीए अभ्यासक्रमांसाठी तंत्रशिक्षण संचालनालय मंडळातर्फे प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. प्रताप महाविद्यालय परिसरातील आयएमटी बिल्डिंगमध्ये याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत आहे. बीबीए व बीसीए सीईटी नोंदणीची अंतिम तारीख १८ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# रोटरी क्लबतर्फे पिंपळे खुर्द येथे महिला शेतकरी गटाचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक महिला दिनानिमित्त येथील रोटरी क्लबतर्फे तालुक्यातील पिंपळे खुर्द येथे 'धरती माता महिला शेतकरी गटाचा' सत्कार करण्यात आला. श्री दत्त मंदिर (चिमणपुरी) येथे पार पडला.



एकेकाळी पाण्यासाठी झगडणारे व उन्हाळ्यात टँकरसाठी रांगा लागणारे पिंपळे खुर्द गाव जलसंपन्नतेकडे वाटचाल करत आहे. हा सकारात्मक बदल पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या 'धरती माता महिला शेतकरी गटाच्या' महिलांच्या एकजुटीमुळे शक्य झाला आहे. गटशेतीच्या माध्यमातून एकत्र येत महिलांनी लोकवर्गणी, सेवा सहयोग संस्था, मारवाड विकास मंच तसेच स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे केली. महिलांनी गावातील नाल्यांची खोली वाढवून सुमारे १३ हजार घनमीटर माती काढली. त्यामुळे अंदाजे १ कोटी ३० लाख लिटर पाणीसाठा निर्माण झाला. तसेच पाझर तलावाचे ७ हजार घनमीटर खोलीकरण करून सुमारे ७० लाख लिटर पाणीसाठा निर्माण करण्यात आला. त्यामुळे गावातील विहिरींची पाणीपातळी वाढली असून रब्बी हंगामातील पिकांना मोठा आधार मिळाला आहे. पूर्वी उन्हाळ्यात टँकरवर अवलंबून राहणाऱ्या गावाला आता मोठा दिलासा मिळाला आहे. याशिवाय महिलांनी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने 'बिहार पॅटर्न'नुसार पाझर तलाव परिसरात सुमारे १ हजार झाडांची लागवड केली आहे. शेताच्या बांधावर फळझाडे लावण्याचेही नियोजन सुरू केले आहे. महिला गटातील सदस्यांनी आपल्या कार्याची माहिती दिली. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी यांनी रोटरी संस्थेचे कार्य व समाजोपयोगी प्रकल्पांबाबत माहिती दिली. प्रोजेक्ट चेअरमन अजय केले यांनी महिला दिनानिमित्त महिलांना शुभेच्छा दिल्या. विजय महेश्वरी, रोनक संकलेचा, विजय पाटील, रोहित सिंघवी आदी उपस्थित होते. रोटरी क्लबचे सचिव आशिष चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. ▲

# मोटारसायकलच्या धडकेत मजूर गंभीर जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पारोळा रस्त्यावर भरधाव मोटारसायकलने दिलेल्या धडकेत एक मजूर गंभीर जखमी झाला आहे. ही घटना रविवार, दि. १ मार्चद रोजी घडली होती. याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात मोटारसासयकल चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी सांगितले, की शिवाजी प्रल्हाद बिऱ्हाडे (वय ४५, रा. शेळावे बु., ता. पारोळा) हे १ मार्च रोजी लग्नसमारंभासाठी कावपिंपी (ता. अमळनेर) येथे गेले होते. दुपारी सुमारे साडेचारच्या सुमारास झाल्यानंतर ते लघुशंकेसाठी गावाबाहेर अमळनेरकडे जाणाऱ्या रस्त्याने पायी जात होते. यावेळी पाठीमागून भरधाव मोटारसायकलने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत श्री. बिऱ्हाडे यांना डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. श्री. बिऱ्हाडे यांचे बंधू पंकज बिऱ्हाडे यांनी त्यांना धुळे येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर धुळे येथे उपचार सुरू आहेत. हवालदार कैलास शिंदे तपास करीत आहेत. ▲

# अमळनेर भूषण, सेवाव्रती पुरस्काराचे पूर्णवाद परिवारातर्फे वितरण..!

## ओमप्रकाश मुंदडा, डॉ. अविनाश जोशी यांचा सन्मान...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जीवन कला संस्कार केंद्र अमळनेर व श्री पारनेरकर गुरु सेवा मंडळातर्फे २०२५- २६ या वर्षातील 'अमळनेर भुषण पुरस्कार' ओमप्रकाश मुंदडा तर 'घ. भी. धांडे सेवाव्रती पुरस्कार' डॉ. अविनाश जोशी यांना नुकताच सन्मानपूर्वक देण्यात आला. रविवार, दि. ८ मार्च रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात येथे पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. गुणेशजी पारनेरकर अध्यक्षस्थानी होते. जळगाव येथील केशवस्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर प्रमुख अतिथी होते. पुरस्कारार्थी ओमप्रकाश मुंदडा व डॉ. अविनाश जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अमळकर यांनी केशव स्मृती समूहाच्या सामाजिक कार्याचा परिचय करून दिला व उपस्थितांशी संवाद साधला.



*अमळनेर : सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित ओमप्रकाश मुंदडा, डॉ. अविनाश जोशी व मान्यवर.*

गुणेशजी पारनेरकर म्हणाले, की यांनी त्यांचे प्रबोधनात व्यक्तीची उन्नती ही समाज उन्नती होण्यासाठी आवश्यक आहे. संस्कार हे व्यक्तीवर होतात तर, संस्कृतीचे दर्शन समाजातून होते. केवळ सामाजिक विकास हे ध्येय न ठेवता व्यक्ती, व्यक्तित्व व व्यक्तिमत्व घडवणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगेश पाटील यांनी मधुर बासरी वादनाने सर्वांना मंत्रमुग्ध झाले. सौ. पपीता जोशी यांनी सूत्रसंचालन केले. जीवन कला संस्कार केंद्राचे अध्यक्ष डॉ. अशोक रावेरकर यांच्यासह अमळनेर, सावदा, जळगाव व धुळे येथील सर्व शिष्यवृंद मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. ▲

# सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे उद्योजक कार्यशाळा उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे सोमवार, दि. ९ मार्च रोजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय उद्योजकता कार्यशाळा उत्साहात झाली. पुणे येथील डॉ. रिजवान पिंजारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत 'आव्हाने आणि संधी' या विषयावर ही कार्यशाळा घेण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी प्रमुख अतिथींचा सत्कार केला.

डॉ. रिजवान पिंजारी यांनी नवीन व्यवसाय सुरू करण्याच्या संधी, स्टार्टअप्समधील आव्हाने, नवोन्मेषाचे महत्त्व तसेच उद्योजकतेच्या क्षेत्रातील करिअर संधी याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता अभिवचन कक्षाचे समन्वयक डॉ. मुकेश भोळे सर, को-आर्डिनेटर डॉ. पुष्पा पाटील, डॉ. रवी बाळस्कर, डॉ. विवेक बडगुजर, डॉ. नीलेश चित्ते, प्रा. उर्मिला वाघ, प्रा. निकिता पाटील, प्रा. नम्रता बडगुजर, प्रा. प्राची पारील, प्रा. रूपाली पाटील उपस्थित होते.


प्रा. वैशाली महाजन यांनी अतिथींचा परिचय करून दिला. विभागप्रमुख प्रा. शशिकांत जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कल्याणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ममता महाजन यांनी आभार मानले.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. वैशाली महाजन, प्रा. नूतन बडगुजर, प्रा. नेहा महाजन, प्रा. आदित्य संकलेचा, प्रा. नेहा पाटील, प्रा. ममता महाजन, प्रा. कल्याणी पाटील, प्रा. भावना महाजन, प्रा. दिव्या महाजन यांनी सहकार्य केले. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# नाना फडणवीस : मराठा साम्राज्याचे दूरदर्शी मुत्सद्दी



**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठा साम्राज्याच्या इतिहासात मुत्सद्देगिरी, दूरदृष्टी आणि प्रशासन कौशल्य यांचा उत्कृष्ट संगम ज्यांच्यामध्ये दिसून येतो असे व्यक्तिमत्त्व म्हणजे नाना फडणवीस. त्यांचा १३ मार्च रोजी स्मृतिदिन. यानिमित्त त्यांच्या कार्याची आणि योगदानाची आठवण करणे म्हणजे मराठा इतिहासातील एका तेजस्वी अध्यायाचे स्मरण होय.

### प्रारंभिक जीवन

नाना फडणवीस यांचे खरे नाव बाळाजी जनार्दन भानू होते. त्यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ या दिवशी झाला. लहानपणापासूनच त्यांना लेखाशास्त्र, राज्यकारभार आणि मुत्सद्देगिरी यांची उत्तम जाण होती. पुढे मराठा साम्राज्यातील पेशव्यांच्या दरबारात त्यांनी आपल्या बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा आणि कुशल प्रशासनामुळे महत्त्वाचे स्थान मिळविले.

### पेशवाईतील भूमिका

मराठा साम्राज्याच्या राजकारणात माधवराव पेशवे यांच्या काळात नाना फडणवीस यांचा प्रभाव वाढला. पेशव्यांच्या प्रशासनात ते आर्थिक व परराष्ट्र धोरणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत होते. त्यांची गणना अत्यंत चतुर आणि संयमी मुत्सद्द्यांमध्ये होत असे. सन १७६१ मध्ये झालेल्या पानिपतची तिसरी लढाई नंतर मराठा साम्राज्याला मोठा धक्का बसला होता. त्या कठीण काळात साम्राज्य पुन्हा उभे करण्यासाठी अनेक नेत्यांसोबत नाना फडणवीस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### बारभाई मंडळ आणि सत्तासंतुलन

पेशवे नारायणराव पेशवे यांच्या हत्येनंतर मराठा दरबारात मोठे राजकीय संकट निर्माण झाले. त्या वेळी नाना फडणवीस यांनी बारभाई मंडळ स्थापन करून राज्यकारभार सांभाळला. त्यांनी बालपेशवे सवाई माधवराव यांच्या नावाने राज्य चालवले आणि मराठा साम्राज्यात स्थैर्य राखले. नाना फडणवीस हे परराष्ट्र धोरणात अत्यंत कुशल होते. त्यांनी इंग्रज, हैदराबादचा निजाम आणि इतर भारतीय राजवटींमध्ये कुशल संतुलन ठेवले. त्यांच्या मुत्सद्देगिरीमुळे मराठा साम्राज्याची सत्ता दीर्घकाळ टिकून राहिली.

### प्रशासन आणि आर्थिक सुधारणा

नाना फडणवीस यांची खासियत म्हणजे त्यांचे काटेकोर आर्थिक नियोजन. त्यांनी राज्याच्या महसूल व्यवस्थेत सुधारणा करून खजिना सक्षम ठेवला. प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि नियोजन या गोष्टींना त्यांनी विशेष महत्त्व दिले.

### पुण्यातील वास्तू आणि वारसा

नाना फडणवीस यांनी पुण्यात अनेक विकासकामे केली. त्यांचे प्रसिद्ध निवासस्थान म्हणजे नाना वाडा. आजही हा वाडा त्यांच्या कार्याची साक्ष देत उभा आहे आणि मराठा इतिहासातील महत्त्वाचे स्मारक मानला जातो.

### स्मृतिदिनाचे महत्त्व

१३ मार्च १८०० रोजी नाना फडणवीस यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांची दूरदृष्टी, प्रामाणिकता आणि राष्ट्रहितासाठी केलेली सेवा यांची आठवण करणे अत्यंत आवश्यक आहे. मराठा साम्राज्याच्या राजकारणात त्यांनी दाखवलेली संयमित आणि शहाणी मुत्सद्देगिरी आजही प्रेरणादायी आहे. नाना फडणवीस हे केवळ एक मंत्री नव्हते, तर मराठा साम्राज्याचे धोरणकर्ते आणि रक्षक होते. संकटाच्या काळात साम्राज्याला स्थैर्य देणारे हे व्यक्तिमत्त्व भारतीय इतिहासात कायम स्मरणात राहील. त्यांच्या कार्यातून नेतृत्व, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टी यांचे अमूल्य धडे मिळतात.

# विमानांचा आवाज आकाशातून झाला गायब; प्रवाशांत घबराट

## संयुक्त अरब अमिराती सरकारचा प्रचंड मोठा मानवतावादी प्रतिसाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत गजबजलेल्या विमानतळांच्या मध्यभागी, जेथे हजारो पर्यटक आपल्या मायदेशी परतण्यासाठी सज्ज होते तेथे अचानक एका भीतीच्या सावटाने सर्वांना ग्रासले. स्क्रीनवर लाल अक्षरात 'रद्द' असे संदेश झळकू लागले. विमानांचा आवाज आकाशातून गायब झाला आणि संयुक्त अरब अमिरातीच्या अवाढव्य विमानतळांवर एक रहस्यमय शांतता पसरली. प्रादेशिक तणावामुळे हवाई हद्द बंद होताच प्रवाशांमध्ये घबराट पसरली. 'आम्ही आता कुठे जाणार? या महागड्या शहरात दिवस किंवा आठवडे राहण्याचा खर्च आम्ही कसा पेलणार? आम्ही विमानतळाच्या बाकड्यांवरच अडकून पडणार का?' हजारो कुटुंबांच्या मनात भीती होती.




कारण ते एका अशा संकटाचे बळी ठरले होते जे त्यांनी निर्माण केले नव्हते.

या संकटात जो 'प्लॉट ट्विस्ट' आला त्याने संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला आहे. तो म्हणजे संयुक्त अरब अमिरातीच्या सरकारचा प्रचंड मोठा मानवतावादी प्रतिसाद! 'अडकलेल्या प्रवाशांचे काय होणार?' या प्रश्नाचे उत्तर एका ऐतिहासिक आदेशाने मिळाले. अबू धाबी आणि दुबई या दोन्ही राज्यांनी सर्व हॉटेल्सना तातडीने निर्देश दिले आहेत, की जे पर्यटक बाहेर जाऊ शकत नाहीत, त्यांच्या निवासाची सोय वाढविण्यात यावी. पण खरी 'धमाका' बातमी पुढे आहे. अबू धाबीमध्ये सांस्कृतिक आणि पर्यटन विभागाने पुष्टी केली आहे, की या वाढीव मुक्कामाचा संपूर्ण खर्च सरकार उचलणार आहे. यात केवळ राहणेच नाही, तर जेवण आणि इतर हॉटेल शुल्काचाही समावेश आहे. कोणत्याही पाहुण्याला त्यांच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या या परिस्थितीसाठी स्वतःच्या खिशातून एक दिरहामही खर्च करावा लागणार नाही.

या प्रवासाच्या दुःस्वप्नाचा शेवट संयुक्त अरब अमिरातीच्या अतुलनीय आदरातिथ्याने झाला. 'हॉटेलचे बिल कोण भरणार?' या सस्पेन्सचे उत्तर एका अशा राष्ट्राने दिले जे आपल्या पाहुण्यांना केवळ आकडा न मानता कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागवते. इतर देश कदाचित प्रवाशांना विमा कंपन्यांशी भांडायला सोडून देतात, पण संयुक्त अरब अमिरातीने कोणत्याही परिस्थितीत पर्यटकांच्या कल्याणासाठी समन्वय साधला आहे. या कृतीने जागतिक गोंधळाच्या क्षणाला सुरक्षिततेच्या विश्वासात बदलले आहे. हे सिद्ध झाले, की जेव्हा आकाश बंद असते तेव्हा अमिरातीची हृदये पूर्णपणे उघडी असतात. 'अडकलेला प्रवासी' ही भीती संपून आता '५-स्टार सरकार' ही ओळख समोर आली आहे.

जेव्हा ही 'मोफत मुक्कामाची' बातमी टर्मिनलवर असलेल्या हताश गर्दीपर्यंत पोहोचली, तेव्हा एक संदेश स्पष्ट होता तुम्ही येथे निर्वासित नाही, तर राज्याचे अतिथी आहात. रिकाम्या पाकिटाची चिंता एका ऐतिहासिक उदारतेने संपली असून, पर्यटनासाठी एक नवीन जागतिक मानक प्रस्थापित झाले आहे. हे सिद्ध झाले आहे, की वादळाच्या वेळी संयुक्त अरब अमिराती हे जगातील सर्वांत विश्वासार्ह बंदर आहे.

# इराण युद्धामुळे सारेच 'गॅस'वर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज दोन बातम्या वाचल्या–

**पहिली :** पुण्यातील वैकुंठातील शवदाहिनी बंद झाली. ही वाहिनी गॅसवर चालते, तो एलपीजी गॅस सध्या मिळत नसल्याने दाहिनी तात्पुरती बंद झाली.


**दुसरी :** बेंगळुरूमधील हॉटेल्स आता बंद असणार आहेत. हॉटेल्स चालवण्यासाठी कमर्शियल एलपीजी गॅस लागतो. त्याचा तुटवडा असल्याने ही हॉटेल्स बंद असणार आहेत.

भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा अमेरिका-इस्राएलने इराण विरुद्ध छेडलेल्या युद्धामुळे होत आहे. आपण आपल्या स्वयंपाकासाठी जो गॅस सिलेंडर वापरतो तो एलपीजीचा असतो. हा एलपीजी पूर्णपणे भारतात तयार होत नाही. आपण आपल्या गरजेच्या ८०टक्के ते ९५ टक्के एलपीजी आयात करतो. त्यातला बहुसंख्य एलपीजी आखाती देशांतून येतो. तो सगळा होर्मुझच्या आखातातून येतो. अमेरिका-इस्राएलने केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझचे आखात बंद केले आहे. त्यातून ते काहीही पुरवठा होऊ देत नाहीत. परिणाम म्हणून भारतात येणारा एलपीजी बंद झाला आहे. हा बंद झाला आहे म्हणून सरकारने कमर्शियल वापराचा एलपीजी देणे बंद केले आहे. याचा थेट परिणाम हॉटेल्स, रेस्टॉरंट्सपासून ते गॅसदाहिन्यांपर्यंत सगळ्यांना भोगावा लागत आहे. या सर्व सेवा 'गॅस' नसल्याने बंद पडत आहेत.



हे युद्ध असेच सुरू राहिले आणि आखातातून एलपीजी गॅस येणे बंदच राहिले, तर त्याचा परिणाम घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा होण्यात व्हायची शक्यता आहे. अमेरिका-इस्राएल या दोन आक्रमक देशांच्या अत्यंत स्वार्थी-आढ्यतेखोर नेत्यांनी सुरू केलेल्या युद्धामुळे आख्खे जग गॅसवर आलेले आहे. याचे परिणाम त्या देशांमधील नागरिकांसह सर्व जगभरातील सगळ्या सर्वसामान्यांना भोगावे लागणार आहेत. मूठभर मूर्ख माणसांनी नियंत्रित केलेल्या अत्यंत विचित्र काळात राहत आहोत आपण.

# जब पहली बार विलेन बनकर धर्मेंद्र ने मचाया था बवाल, ६० साल पुरानी इस फिल्म ने बॉक्स ऑफिस पर किया था धमाका



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदी सिनेमा के ' ही-मैन ' धर्मेंद्र अपनी दमदार पर्सनैलिटी और करिश्माई एक्टिंग के लिए जाने जाते हैं। उन्होंने अपने करियर में रोमांस, एक्शन और कॉमेडी हर जॉनर में शानदार अभिनय किया। लेकिन बहुत कम लोग जानते हैं कि धर्मेंद्र ने अपने करियर की शुरुआत एक नेगेटिव रोल से पहचान पाई थी, जिसने बॉक्स ऑफिस पर तहलका मचा दिया था।

### विलेन बनकर छा गए थे धर्मेंद्र

धर्मेंद्र ने १९६० में फिल्म ' दिल भी तेरा हम भी तेरे ' से अपने फिल्मी सफर की शुरुआत की थी, जो बॉक्स ऑफिस पर असफल रही। हालांकि, उन्होंने हार नहीं मानी और लगातार मेहनत जारी रखी। ' अनपढ़ ' और ' शोला और शबनम ' जैसी फिल्मों से उन्हें थोड़ी पहचान मिली, लेकिन उनकी किस्मत १९६४ में रिलीज़ हुई फिल्म ' आई मिलन की बेला ' से पूरी तरह बदल गई। इस फिल्म का निर्देशन मोहन कुमार ने किया था, और इसमें राजेंद्र कुमार व सायरा बानो मुख्य भूमिकाओं में थे। यह पहली बार था जब धर्मेंद्र इन सुपरस्टार्स के साथ स्क्रीन शेयर कर रहे थे। फिल्म में धर्मेंद्र ने विलेन का किरदार निभाया था, जो दर्शकों पर इतना भारी पड़ा कि वे फिल्म के हीरो पर भी छा गए।

फिल्म ने किया था बंपर कलेक्शन ' आई मिलन की बेला ' १९६४ की सुपरहिट फिल्मों में गिनी जाती है। धर्मेंद्र के नेगेटिव रोल ने दर्शकों को हैरान कर दिया। उनके सशक्त अभिनय और बेहद आकर्षक व्यक्तित्व ने सबका ध्यान खींच लिया।

इस रोल के बाद धर्मेंद्र के पास फिल्मों की झड़ी लग गई और वे देखते ही देखते बॉलीवुड के एक्शन किंग और ही-मैन के नाम से मशहूर हो गए। इंडियन बॉक्स ऑफिस कलेक्शन की रिपोर्ट्स के मुताबिक, फिल्म ' आई मिलन की बेला ' ने उस समय करीब २.२५ करोड़ रुपये का शानदार कलेक्शन किया था जो १९६० के दशक में एक बड़ी रकम मानी जाती थी।

### सुपरहिट फिल्मों की लाइन

इस फिल्म के बाद धर्मेंद्र ने ' हकीकत ', ' फूल और पत्थर ', ' तुम हसीन मैं जवान ', ' मेरा गांव मेरा देश ', ' सीता और गीता ' और ' शोले ' जैसी सुपरहिट फिल्मों में काम किया और भारतीय सिनेमा के सबसे लोकप्रिय कलाकारों की सूची में शामिल हो गए।धर्मेंद्र की यह कहानी इस बात का उदाहरण है कि सच्चे कलाकार किसी भी किरदार को अपनी मेहनत और प्रतिभा से अमर बना सकते हैं चाहे वह हीरो हो या विलेन।

**सक्सेस स्टोरी**

# अपघातात पाय गेले, स्मृतीही गेली... जिद्दीतून 'आयएएस' उत्तीर्ण...!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऐन उमेदीच्या काळात अपघातामुळे व्हीलचेअरवर यावे लागलेल्या अथिरा आज क्लास वन अधिकारी झाली आहे. अपयश आल्यानंतर हार न मानता तिने खूप अभ्यास केला. आज ती आयएएस आहे. नुकताच केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाला जाहीर झाला आहे. या निकालात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी कमाल केली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेकांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. परंतु या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सध्या एका आगळ्यावेगळ्या आणि सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या एका विद्यार्थिनीची सगळीकडे चर्चा होत आहे.

यूपीएससी उत्तीर्ण केलेल्या या महिला विद्यार्थिनीचे नाव अथिरा सुगथन असे आहे. यूपीएससी २०२५ या वर्षातील परीक्षेत अथिराला ४८३ वा रँक मिळाला आहे. ती आता क्लास वन अधिकारी झाली आहे. परंतु तिचा प्रवास खूपच कठीण आणि खडतर राहिलेला आहे. तिला ऐन उमेदीच्या काळात अपघातामुळे व्हीलचेअरवर दिवस काढावे लागले. सोबतच तिला ॲम्नेशिया या दुर्मिळ आजारालाही तोंड द्यावे लागले. ॲम्नेशिया या आजारात माणसाची स्मरणशक्ती कमी होते. ती व्यक्ती सर्व काही विसरायला लागते. अथिरा ही बीडीएस म्हणजेच दंतवैद्यकशास्त्राचा अभ्यास करत होती. ती एक डेन्टिस्ट होणार होती. परंतु तिचा याच काळात अपघात झाला आणि तिला व्हीलचेअरशिवाय चालणे अशक्य झाले. कायमस्वरूपी व्हीलचेअरवरच दिवस काढावे लागणार हे समजूनही ती खचली नाही. तिने जिद्दीने अभ्यास केला.

यूपीएससीची परीक्षा देण्याचा तिचा हा चौथा प्रयत्न होता. अपयश आल्यानंतर तिने हार न मानता ती सतत प्रयत्न करत राहिली. परिणामी आज यश तिच्या पायाशी लोळण घेत आहे. ती आता आयएएस अधिकारी झाली आहे. केरळच्या अथिराचे देशभरात कौतुक केले जात आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# मानवी जीवनात वास्तुशास्त्र महत्त्वाचेच!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मानवी जीवनात वास्तुशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व असून, घराची रचना आणि तेथील उर्जेचा आपल्या प्रगतीवर थेट परिणाम होत असतो. अनेकदा अतोनात परिश्रम करूनही यश मिळत नाही किंवा व्यवसायात अचानक मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागतो. अशा वेळी केवळ नशिबाला दोष न देता घरातील वास्तुदोषांकडे लक्ष देणे गरजेचे असते. घरात सुख, शांती आणि आर्थिक सुबत्ता नांदावी यासाठी वास्तुशास्त्रामध्ये काही सोपे पण अत्यंत प्रभावी उपाय सांगण्यात आले आहेत. ज्याच्या पालनाने जीवनातील नकारात्मकता दूर होऊ शकते.

घरातील नकारात्मक ऊर्जा बाहेर काढण्यासाठी गंगा जल हे अत्यंत पवित्र आणि गुणकारी मानले जाते. हिंदू धर्मशास्त्रानुसार दररोज सकाळी घराची नीट साफसफाई आणि स्वच्छता केल्यानंतर संपूर्ण वास्तूत गंगा जल शिंपडावे. या प्रक्रियेमुळे घरातील वाईट शक्तींचा नाश होतो आणि सकारात्मक ऊर्जेचा संचार वाढतो. आर्थिक चणचण भासत असल्यास हा उपाय केल्याने धनलाभ होण्याचे मार्ग मोकळे होतात आणि कुटुंबाला बरकत प्राप्त होते, असा सल्ला देण्यात येतो.

हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत पवित्र स्थान असून तिला गो माता म्हणून पूजले जाते. वास्तुशास्त्रानुसार, नियमितपणे गायीची सेवा केल्यास मनुष्याला आयुष्यात कोणत्याही गोष्टीची कमतरता राहत नाही. घराच्या दारात आलेल्या गायीला कधीही उपाशीपोटी परत पाठवू नये; तिला चारा किंवा अन्न दिल्यास घराची आर्थिक प्रगती वेगाने होते. हा एक सात्त्विक उपाय मानला जातो, ज्यामुळे घरातील सदस्यांचे भाग्य उजळण्यास मदत होते आणि घराची सर्वार्थाने भरभराट होते.

अनेक घरांमध्ये देवाला वाहिलेली फुले सुकल्यानंतरही तशीच ठेवली जातात, ज्याला आपण निर्माल्य म्हणतो. मात्र, वास्तुशास्त्रानुसार सुकलेली फुले घरात ठेवणे अशुभ मानले जाते. अशा निर्माल्य स्वरूपातील फुलांमुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि प्रगतीत अडथळे येतात. त्यामुळे घरातील प्रसन्नता आणि ऊर्जेचे संतुलन टिकवण्यासाठी शिळी आणि सुकलेली फुले त्वरित काढून टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक संपन्नता टिकवून ठेवण्यासाठी जेवणाच्या सवयी आणि दिशा यांचाही जवळचा संबंध असतो. वास्तुशास्त्रानुसार, भोजन करताना व्यक्तीचे तोंड नेहमी पूर्व किंवा पश्चिम दिशेला असावे. या विशिष्ट दिशांना मुख करून जेवण केल्याने घरात कधीही अन्न आणि धनाचा तुटवडा जाणवत नाही. या साध्या वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या नियमांचे पालन केल्यास घरातील दारिद्र्य कायमचे नष्ट होऊन लक्ष्मीचा आशीर्वाद प्राप्त होतो, अशी मान्यता आहे.

# बुधाचे नक्षत्र आणि अष्टमी अद्वितीय योग

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बुध ग्रह हा वाणी, तर्कशक्ती, संवाद कौशल्य, दूरसंचार, व्यापार, गणित, शेअर मार्केट, पत्रकारिता आणि सध्या सगळ्यात जास्त ज्याची चलती आहे ते म्हणजे सोशल मीडिया. याचा कारक ग्रह बुध आहे.

हा ग्रह चांगला असेल तर वरील सर्व बाबी चांगल्या होतील आणि बुध ग्रह बिघडला असेल तर वाणीचे दोष निर्माण होतात. त्वचेचेही दोष निर्माण होतात. सौर मंडळातील सगळ्यात छोटा ग्रह आणि सगळ्यात वेगाने परिभ्रमण करणारा ग्रह म्हणून बुध ग्रह प्रसिद्ध आहे. ८८ दिवसांत हा सूर्याची परिक्रमा पूर्ण करतो. बहुतेक वेळा हा सूर्याचा अगदी जवळ असतो. त्यामुळे बुधादित्य योग निर्माण होतो. हा चांगला योग मानला गेला आहे. मिथुन आणि कन्या राशी या राशींत कन्यामध्ये बुध उच्चता असतो आणि मीन राशीमध्ये नीचचा असतो. चांगला बुध असणारा व्यक्ती उत्तम वक्ता होतो. असा ग्रहमंडळातील युवराजला प्रसन्न करणे अतिशय आवश्यक आहे आणि त्यासाठी बुधाष्टमीसारखा योग चालून आल्यावर तर अजिबात वाया घालू नका. तशात यावेळी ज्येष्ठ नक्षत्र जे त्याचे स्वतःचे नक्षत्र आहे त्यावेळी हा योग आला आहे. तिथी, वार, नक्षत्र एकाच ग्रहाचे येणे हे खूप दुर्मिळ घडते.

अनेक वर्षांतून एखाद्या वेळी हा योग येतो. नॉर्मल बुधाष्टमी दरवर्षी दोन तीनदा येते. पण बुधाष्टमीला बुधाचे नक्षत्र हा अतिशय क्वचित येणारा योग आहे. सर्वांनी या दिवशी तुमचा पत्रिकेत बुध चांगला असो किंवा वाईट असो. बुधाचा मंत्र जप अगदी अवश्य करा आणि ज्यांचा वाईट आहे त्यांनी दान करा. चांगला आहे त्यांनी त्याच्या वस्तू धारण करा.

## बुध अष्टमी

रविवार, सप्तमी, सोमवार, अमावास्या, मंगळवार, चतुर्थी आणि बुधवार अष्टमी या तिथी-वारांचे संयोग झाले तर सूर्यग्रहणाप्रमाणे पुण्यदायक मानले जाते. ज्या अष्टमी तिथीला बुधवार येतो ती



बुध अष्टमी असते. त्यातही माघ महिन्यात शुक्ल पक्षात जर अष्टमी तिथीला बुधवार आला तर तो अत्यंत विशेष आहे, असे समजायला हवे.

## बुध ग्रहाचे पूजन का करावे?

१) बुध ग्रहाचे पूजन करतानाच लक्ष्मी, विष्णू आणि शिवपार्वती यांचेही पूजन केल्याने जन्म-जन्मांतरीचे दोष जातात.

२) जो व्यक्ती बुध अष्टमीला व्रत करतो, उपवास करतो, पूजन करतो त्याच्या पुण्याची गणनाच नाही. अशीच कथा ब्रह्मांडपुराण आणि इतर काही धार्मिक ग्रंथांमध्ये दिलेली आहे.

३) पुराण ग्रंथांमध्ये न दिलेला पण अत्यंत अनुभूत आणि प्रभावी उपाय म्हणजे तृतीयपंथींची उद्या जो कोणी मनोभावे पूजा करेल म्हणजे त्यांना हिरव्या वस्तू आदरपूर्वक दान करेल त्याची बुध ग्रहाची पीडा नक्कीच नष्ट होईल. त्याची बुद्धी तेज होईल. व्यापारामध्ये यशस्वी होईल. वाणीमध्ये प्रभाव येईल. मज्जासंस्थांशी निगडीत कोणताही रोग होणार नाही. मज्जासंस्थासंबंधी रोग असेल तरी तो बरा होईल.

४) शास्त्रात तर सांगितले आहे, की जो कोणी बुध अष्टमी करेल तो नरकात जाणार नाही. यंदा ११ मार्च २०२६ रोजी बुधवारी बुध अष्टमी साजरी झाली. या दिनी बुध ग्रहाच्या कृपादृष्टीसाठी अनेक ठिकाणी तृतीयपंथीय व्यक्तींना अनेकांनी हिरवी साडी, हिरवा पेटिकोट, हिरवे ब्लाऊज पीस, हिरवी मिठाई दिली.

५) ज्यांना खर्चिक बाबी शक्य नसतात ते बुध अष्टमीला अर्थात बुधवारी हिरव्या भाज्यांचे दान करतात.

६) गाईला पालक खाऊ घालावी. हिरवे मूग गाईला खाऊ घालावेत. त्यामुळेही खूप फायदा होतो.

७) बुध ग्रह जर पीडा देत असेल तर रामरक्षास्तोत्र सुद्धा खूप चांगले काम करते. रामरक्षा स्तोत्राचे विशेष संख्यात्मक पाठ करावेत. म्हणजे बुध ग्रह पीडा नष्ट होते. रामरक्षासारखे स्तोत्र आणि ग्रह मंत्र जप मात्र ग्रहकारक असो अथवा अकारक असो दोन्हींमध्ये फायदाच देतात.

एकेकाळी हिरवे बुधवार, पांढरे बुधवार असे सुद्धा प्रचलित होते. आठ वर्षे नियमित जर बुध अष्टमी केली, तर त्याचे अत्यंत अद्वितीय फायदे आहेत. शेअर मार्केटमध्येही बुध ग्रह खूप कामाचा आहे. आपल्या पत्रिकेत बुध चांगला असेल, कारक असेल तरच त्याचे रत्न पन्ना त्याच्या दशा-अंतरदशामध्ये धारण करावे. एक नियम कायम लक्षात ठेवावा, की कोणताही ग्रह जर तुम्हाला कारक असेल, शुभ असेल तरच त्या ग्रहाच्या रंगाची वस्त्रे, उपरत्न धारण करावे. ग्रह कारक नसेल तरच त्या वस्तू दान कराव्यात.

# व्हिसा बालाजी : जेथे परदेश वारी स्वप्न होतात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आजच्या हायटेक युगात जेव्हा एखादा तरुण पदव्या घेऊन अमेरिका किंवा इतर देशात जाण्याचे स्वप्न पाहतो. पण 'व्हिसा रिजेक्शन'चा शिक्का त्याच्या पासपोर्टवर पडतो तेव्हा त्याच्या पायाखालची जमीन सरकते. पण याच विज्ञानाच्या जगात एक असे ठिकाण आहे जेथे 'पासपोर्ट' हातात धरून घातलेली एक प्रदक्षिणा तुमचे नशीब बदलू शकते, असे म्हणतात किंवा असे शेकडोंनी अनुभव आहेत. हे ठिकाण म्हणजे हैदराबादचे 'चिलकूर बालाजी' मंदिर. ज्याला आज जग 'व्हिसा बालाजी' म्हणून ओळखते. श्री चित्कला विमर्शन पीठम्, वाशिम यांच्या प्रेरणेतून या जागृत स्थानाचा हा अंगावर शहारे आणणारा इतिहास शेवटपर्यंत नक्की वाचा. कारण हा केवळ इतिहास नसून लाखो तरुणांच्या परदेशवारीचा स्वप्न पूर्ण करणारे हे ठिकाण आहे, असे म्हणतात.

गोष्ट आहे साधारण ५०० वर्षांपूर्वीची. त्या काळी ना विमाने होती, ना इंटरनेट. पण एक गोष्ट होती 'अढळ श्रद्धा'. याच परिसरात एक म्हातारा भक्त राहायचा, ज्याच्या आयुष्याचे एकच ध्येय होते तिरुपतीच्या व्यंकटेश्वराचे दर्शन. दरवर्षी तो 'पदयात्रा' (पायी प्रवास) करून डोंगराची वारी करायचा. पण वय झाले आणि शरीराने 'सहकारम' (साथ) देणे बंद केले. एकदा प्रकृती इतकी खालावली, की त्याला हालचाल करणेही अशक्य झाले. तो म्हातारा देवाच्या फोटोसमोर बसून ढसाढसा रडू लागला, 'स्वामी, या 'मुसलोडीला' (म्हातारा माणूस) आता डोंगर चढणे शक्य नाही, पण तुम्हाला पाहिल्याशिवाय मला 'शांती' लाभणार नाही. माझी वारी चुकली देवा, आता मी प्राण तरी सोडीन किंवा तुम्हाला डोळे भरून तरी पाहीन.

भक्ताची ही 'आरुध्रता' (व्याकुळता) पाहून खुद्द देवालाही





पाझर फुटला. त्याच रात्री स्वप्नात साक्षात 'स्वामी' प्रकटले आणि म्हणाले, 'घाबरू नकोस, तुला तिरुपतीला येण्याची 'अवासरम' (गरज) नाही. मी स्वतः तुझ्यासाठी तुझ्याच मातीत प्रकट होतोय.' देवाने त्याला जवळच्याच एका 'पुट्टा'पाशी (वारूळ) जायला सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी गावकऱ्यांनी तेथे खोदकाम सुरू केले. अचानक एक 'खणकन' असा आवाज झाला आणि कुदळीचे टोक एका शिळेला लागले. काय आश्चर्य. तेथून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. लोक 'भयम'ने (भीतीने) मागे सरकले. पण जशी माती बाजूला झाली, तशी तेथे भगवान श्री व्यंकटेश्वर, श्रीदेवी आणि भूदेवी यांची अत्यंत लोभसवाणी 'स्वयंभू' मूर्ती प्रकटली. ज्या ठिकाणी देवाने भक्ताच्या ओढीसाठी स्वतःला प्रकट केले, तेथेच हे मंदिर उभारले गेले. असे म्हणतात, की जेव्हा ही बातमी तेव्हाच्या नवाबापर्यंत पोहोचली, तेव्हा त्यानेही या चमत्कारासमोर नतमस्तक होऊन मंदिराला मोठी जमीन दान केली.

पण याला 'व्हिसा बालाजी' हे नाव कसे मिळों? हा किस्सा मोठा रंजक आहे.

१९८० च्या सुमारास हैदराबादची पोरे अमेरिकेला जाण्यासाठी वेडी झाली होती, पण 'रिजेक्शन'मुळे हताश होती. अशाच एका वैतागलेल्या इंजिनिअर पोराने येथे येऊन ११ 'प्रदक्षिण' (फेऱ्या) मारल्या आणि जो व्हिसा तीनदा नाकारला होता, तो तिसऱ्या दिवशी हातात आला. ही वार्ता वणव्यासारखी पसरली आणि पाहता-पाहता या मंदिराचे नाव 'व्हिसा बालाजी' पडले. या प्रदक्षिणेमागे एक खूप मोठे 'शास्त्र' दडले आहे. ११ प्रदक्षिणा म्हणजे आपल्या शरीरातील ११ इंद्रियांचे (५ ज्ञानेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये आणि १ मन) प्रतीक. जेव्हा आपण मन एकाग्र करून या फेऱ्या मारतो, तेव्हा आपली ऊर्जा थेट ईश्वराशी जोडली जाते. आणि इच्छा पूर्ण झाल्यावर लोक १०८ प्रदक्षिणा घालतात. हे १०८ म्हणजे दुसरे- तिसरे काही नसून आपल्या ब्रह्मांडातील २७ नक्षत्रे आणि त्यांच्या ४ चरणांचा (२७ \४ वेळा = १०८) संगम आहे.

या मंदिराचा सगळ्यात मोठा 'रुबाब' म्हणजे येथे व्हीआयपी पद्धत शोधूनही सापडणार नाही. येथे ना 'व्हीआयपी' रांग, ना 'स्पेशल' पावती. जो येईल तो फक्त रांगेत. येथील 'व्यंकय्या' पैशाने नाही तर प्रदक्षिणेने प्रसन्न होतो. आजही चिलकूरच्या या प्रांगणात जेव्हा तुम्ही जाता, तेव्हा हातात कार्ड आणि पेन घेऊन प्रदक्षिणा मोजणाऱ्या हजारो तरुणांच्या डोळ्यांत एक वेगळीच 'आशा' दिसते. ५०० वर्षांपूर्वी एका म्हाताऱ्या भक्तासाठी प्रकटलेला देव, आजही कोडिंग आणि सॉफ्टवेअरच्या जगातल्या पिढीची स्वप्ने पूर्ण करतोय. जर तुमची श्रद्धा अढळ असेल, तर देव सात समुद्र पार करूनही तुमच्या मदतीला धावून येतो, हेच चिलकूरचे सत्य आहे.

# भगवान महादेवांशी संबंधित रहस्यांची उत्तरे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

## १) भगवान महादेव गळ्यात साप धारण का करतात?

भगवान महादेव जेवढे रहस्यमयी आहेत तेवढेच त्यांचे वस्त्र आणि आभूषण विचित्र आहेत. संसारिक लोक या गोष्टींपासून दूरच राहतात. महादेव त्याच गोष्टी स्वतःजवळ बाळगतात. भगवान शिव एकमेव असे देवता आहेत, की जे गळ्यात साप धारण करतात. वास्तवामध्ये साप एक धोकादायक प्राणी आहे, परंतु तो कोणालाही विनाकरण दंश करत नाही. साप परिस्थितिक तंत्राचा महत्त्वपूर्ण जीव आहे. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून पाहिल्यास महादेव गळ्यामध्ये साप धारण करून असा संदेश देतात की, जीवनचक्रात प्रत्येक प्राण्याचे विशेष योगदान आहे. यामुळे कधीही हिंसा करू नये.

## २) महादेवाच्या हातामध्ये त्रिशूळ का आहे?

त्रिशूळ हे भगवान शिव यांचे प्रमुख अस्त्र आहे. त्रिशूळाकडे पाहा... तीन तीक्ष्ण टोक दिसतात. तसे पाहिले तर हे अस्त्र संहाराचे प्रतीक आहे. परंतु वास्तवात त्रिशूळामागे फार मोठा गूढ अर्थ दडला आहे. या जगात तीन प्रकारच्या प्रवृत्ती आहेत. सत, रज आणि तम. सत म्हणजे सत्यगुण, रज म्हणजे सांसारिक आणि तम म्हणजे तामसी अर्थात निशाचरी प्रवृत्ती. प्रत्येक माणसात या तीन्ही प्रवृत्ती आढळून येतात. फक्त या प्रवृत्तींचे प्रमाण प्रत्येकात वेगवेगळे असते. त्रिशुळातील तीन टोक या तीन प्रवृत्तींचे प्रतिनिधीत्व करतात. भगवान शिव आपल्याला संदेश देतात की, या तीन्ही गुणांवर आपले नियंत्रण आहे. हा त्रिशूळ तेव्हाच उचला जेव्हा कठीण परिस्थिती असेल. तेव्हा या तीन्ही गुणांचा आवश्यकतेनुसार वापर करा.

## ३)महादेवाला का प्यावे लागले विष?

समुद्रमंथनातून निघालेले विष भगवान शिव यांनी आपल्या कंठात धारण केले. विषाच्या प्रभावाने त्यांचा कंठ निळा झाला आणि ते निळकंठ नावाने प्रसिद्ध झाले. समुद्र मंथनाचा अर्थ आहे, विचारांचे मंथन. मनामध्ये असंख्य विचार आणि भावना असतात, त्यांचे मंथन करून चागले विचार आचरणात आणावेत. आपण जेव्हा आपल्या मनाचे मंथन करू तेव्हा सर्वात पहिले वाईट विचार बाहेर पडतील. हेच विष असून हे वाईटाचे प्रतीक आहे. महादेवाने हे आपल्या कंठात धारण केले, त्याचा प्रभाव शरीरावर होऊ दिला नाही. महादेवाचे विष प्राशन आपल्याला असा संदेश देतो की, वाईट गोष्टींचा प्रभाव आपल्यावर न होऊ देणे.
वाईट गोष्टींपासून नेहमी दूर राहावे.

## ४) महादेव यांचे वाहन नंदी का आहे?

भगवान महादेव यांचे आवाहन नंदी आहे. बैल अत्यंत कष्टाळू प्राणी आहे. हा प्राणी शक्तिशाली असूनही अत्यंत शांत आणि भोळा आहे. महादेवसुद्धा परमयोगी, शक्तिशाली आणि परम शांत स्वभावाचे तसेच एवढे भोळे आहेत की यांचे क नाव भोलेनाथ सर्व जगात प्रसिद्ध आहे. महादेवाने ज्याप्रकारे कामदेवाला भस्म करून त्यावर विजय प्राप्त केला होता, त्याचप्रमाणे त्यांचे वाहनसुद्धा कामी नाही. त्याचे काम वासनेवर पूर्ण नियंत्रण राहते. या व्यतिरिक्त नंदीला पुरुषार्थाचे प्रतिक मानले जाते. खूप कष्ट करूनही बैल कधीही थकत नाही. हा प्राणी सतत आपले कर्म करत राहतो. याचा अर्थ आपणही सदैव आपले कर्म करत राहावे. कर्म करत राहिल्यामुळे ज्याप्रमाणे नंदी महादेवाला प्रिय आहे त्याचप्रकारे आपणही महादेवाची कृपा प्राप्त करू शकतो.

## ५) महादेवांच्या मस्तकावर चंद्र का आहे?

महादेव भालचंद्र नावानेसुद्धा प्रसिद्ध आहेत. भालचंद्रचा अर्थ मस्तकावर चंद्र धारण करणारा. चंद्राचा स्वभाव शीतल असतो. चंद्राच्या प्रकाश शीतलता प्रदान करतो. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून महादेव आपल्याला असा संदेश देतात की, आयुष्यात कितीही मोठे संकट आले तरी मन, बुद्धी शांत ठेवून कार्य करावे. बुद्धी शांत असल्यास कोणत्याही समस्येतून सहजपणे मार्ग काढला जाऊ शकतो.



## ६) महादेवांना तीन डोळे का आहेत?

धर्मग्रंथानुसार सर्व देवतांना दोन डोळे आहेत, परंतु महादेवाला तीन डोळे आहेत. तीन डोळे असल्यामुळे यांना त्रिनेत्रधारी असेही म्हणतात. लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून पाहिल्यास महादेवाचा तिसरा डोळा प्रतीकात्मक आहे. डोळ्यांचे काम आहे मार्ग दाखवणे आणि रस्त्यामध्ये येणाऱ्या अडचणींपासून सावध करणे. आयुष्यात विविध संकट येत राहतात, जे आपण लवकर ओळखू शकत नाहीत. अशा वेळी विवेक आणि धैर्य एका उत्तम मार्दर्शककाप्रमाणे आपल्याला योग्य-अयोग्य गोष्टीमधील फरक सांगतात. हा विवेक प्रेरणारूपात आपल्यामध्ये असतो. फक्त तो जागृत करण्याची आवश्यकता आहे.

## ७) महादेवांचे संपूर्ण शरीरावर भस्म का लावतात?

आपल्या धर्मशास्त्रात सर्व देवी-देवता अलंकार, वस्त्र, दागीने यांनी सुसज्जित असे दाखवले गेलेले आहेत. तर महादेव फक्त मृगचर्म(हरणाचे कातडे)गुंडाळलेले आणि भस्म लावलेले असतात. भस्म महादेवांचे प्रमुख वस्त्र आहे. कारण महादेवाचे संपूर्ण शरीर भस्माने झाकलेले असते. संतांचे सुद्धा भस्म हेच एकमात्र वस्त्र आहे. अघोरी, संन्यासी आणि इतर साधू आपल्या शरीरावर भस्म लावून फिरतात. महादेवाच्या भस्म लावण्यामागे वैज्ञानिक तसेच अध्यात्मिक कारण आहे.
भस्माचा एक विशेष गुण आहे. भस्म शरीरातील रोमांचित करणाऱ्या छिद्रांना बंद करते. भस्म शरीरावर लावल्याने गरमीमध्ये गरमी आणि थंडीमध्ये थंडी जाणवत नाही. त्वचासंबंधी रोगांमध्ये औषधाचे काम भस्म करते. भस्म धारण करणारे महादेव हा संदेश देतात, की परिस्थितीनुसार स्वतःला बदलने हा मनुष्याचा सर्वांत मोठा गुण आहे.

## ८) शिवलिंगावर भांग, धोत्रा धोतरा का अर्पण करतात?

धार्मिक मान्यतेनुसार महादेवाला भांगप्रेमी सांगण्यात आले आहे. शिवचरित्रामध्ये विविध रोचक गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. परंतु त्यामध्ये सामावलेल्या असाधारण संदेशांमुळेच महादेव पूजनीय आहेत. यामध्ये विशेषतः विषपान, बिल्वपत्र, धोत्रा यासारख्या कडवट सामग्री प्रिय असणे यामागे एक शिकवण आहे. वास्तविकतेमध्ये सुखासाठी शक्ती संपन्न होण्यासोबतच परोपकार, त्याग आणि संयम या गोष्टींद्वारे वाईट सवयी किंवा परिस्थिती स्वरूपातील कडवटपणा गोडव्यामध्ये बदलण्याची शिकवण आहे. याच कारणामुळे शिवलिंगावर भांग, धोत्रा आणि रूटीचे फुल यासारख्या विषारी गोष्टी विशेष मंत्राचा उच्चार करून अर्पण करणे शुभ मानले गेले आहे. या विशेष मंत्राच्या स्मरणाने अपयश स्वरूपातील दुःख समाप्त होऊन सुख आणि यश प्राप्त होईल.

## ९) महादेवांना बेलाचे पान का अर्पण करतात?

विविध ग्रंथांमध्ये महादेवाला बेलाचे पान अर्पण करण्याचे विशेष महत्त्व सांगण्यात आले आहे. तीन पान असलेले एक बिल्वपत्राचा लाईफ मॅनेजमेंट दृष्टिकोनातून विचार केल्यास बिल्वपत्राचे तीन पानं चार पुरुषार्थामध्ये तिघांचे प्रतीक आहे - धर्म, अर्थ व काम. हे तिन्ही निस्वार्थ भावनेने महादेवाला समर्पित करणाऱ्या व्यक्तीला चौथा पुरुषार्थ म्हणजे मोक्ष प्राप्त होतो.

## १०) भगवान शिव यांना स्मशानाचे निवासी का मानले जाते?

महादेवाला संपूर्ण कुटुंब असलेले देवता मानले जाते, परंतु तीरीही ते स्मशानात निवास करतात. भगवान शिव संसारिक असूनही ते स्मशानात निवास करतात. यामागे लाईफ मॅनेजमेंटचे एक गूढ सूत्र दडलेले आहे. हा संसार मोह-मायेचा प्रतिक असून स्मशान वैराग्याचे. महादेव सांगतात, की या संसारात राहून आपले कर्तव्य पूर्ण करावेत, परंतु मोहमायेपासून दूर राहावे. कारण हा संसार नश्वर आहे. कधी न कधी हे सर्व नष्ट होणार आहे. यामुळे संसारात राहून कोणताही मोह न बाळगता आपले कर्तव्य पूर्ण करत वैरागीप्रमाणे आचरण करावे.

## ११) भूत-प्रेत महादेवाचे गण का आहेत?

महादेवाला संहाराचे देवता मानण्यात आले आहे. म्हणजेच जेव्हा मनुष्य आपल्या सर्व मर्यादा तोडू लागतो तेव्हा महादेव त्याचा संहार करतात. ज्या लोकांना आपल्या पाप कर्माचे फळ भोगावे लागते तेच प्रेतयोनी प्राप्त करतात. या सर्वांना महादेव दंडित करतात, कारण शिव संहार देवता आहेत. या कारणामुळे यांना भूत-प्रेतांचा देवता मानले जाते. वास्तवामध्ये जे भूत-प्रेत आहेत ते केवळ एक सूक्ष्म शरीराचे प्रतिक आहेत. महादेवाचा यामागे असा संदेश आहे, की प्रत्येक प्रकारचा जीव ज्याची सर्वजण घृणा करत किंवा त्याला घाबरतात तोसुद्धा महादेवाजवळ पोहोचू शकतो, अट केवळ एवढीच आहे की त्याने स्वतःचे सर्वस्व महादेवाला समर्पित करावे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)